# मुंबई विद्यापीठ

## निवडणूक संदर्भातील जाहीर प्रकटन

**क्र.नि.वि./आयसीडी/२०२२-२३/८०.**

मुंबई विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये किंवा परिसंस्था यांचे व्यवस्थापन प्रतिनिधी, प्राचार्य, विभाग प्रमुख, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक, नोंदणीकृत पदवीधर इत्यादींना याव्दारे सूचित करण्यात येते की, मुंबई विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांची (महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम २६ नुसार) निवडणूक प्रक्रिया सुरू होत असून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम ६२ नुसार नवीन प्राधिकरणांची मुदत दि. ०१ सप्टेंबर, २०२२ पासून पुढील पाच वर्षाकरिता असणार आहे. मा. कुलगुरूंनी निवडणूक प्रक्रिया सुरू करण्याबाबत आदेशित केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम २६ मध्ये नमूद केलेल्या सर्व प्राधिकरणांच्या निवडणूकां संदर्भातील निवडणूक प्रकटन, नावनोंदणी सूचना, तद्अनुषंगिक इतर माहिती, इ. विषयांची संपूर्ण माहिती वेळोवेळी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे. याकरिता विविध प्राधिकरणांच्या निवडणूकीसाठी इच्छूक असलेल्या सर्व घटकांनी वेळोवेळी विद्यापीठाच्या **www.mu.ac.in** या संकेतस्थळावरील **"निवडणूक २०२२ (Election 2022)"** या लिंकवर सूचनांची माहिती घ्यावी.

निवडणूक सूचना व अधिसूचना या संदर्भातील पत्रव्यवहार विद्यापीठाकडून केवळ संकेतस्थळाच्या माध्यमातून केला जाईल. याकरिता वेळोवेळी विद्यापीठाचे संकेतस्थळ बघण्याची जबाबदारी संबंधितांची असेल. तसेच याबाबत काही शंका/अडचणी असल्यास विद्यापीठाच्या निवडणूक विभागास arelection@election.mu.ac.in या इमेलवर वर पाठवाव्यात. सर्व संबंधितांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन विद्यापीठास कृपया सहकार्य करावे.

(डॉ. विनोद पाटील)
प्र. कुलसचिव

दिनांक :- २२ जून, २०२२